सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.क्र.२३५.ठ. क्र.......209
दि...१५/३/१८...रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सैनिकाच्या विधवा पत्नी, वीर पत्नी आजी/माजी सैनिक यांच्या घर/जागेवरचे मिळकत कर घरपट्टी रद्द करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव प्रस्तावात सविस्तर माहिती नमूद असून, मा. शासन निर्णयानुसार संरक्षण दलातील शौर्य पदक धारक अथवा माजी सैनिकांचे विधवा यांच्या मिळकतीच्या संख्या नगण्य असणार आहे. त्यामुळे मा. शासन निर्णय दिनांक ५ एप्रील २०१६ व दिनांक ७ एप्रील २०१६ च्या निर्णयानुसार सोलापूर महानगरपालिका हद्दीतील संरक्षण दलातील शौय पदक धारक अथवा माजी सैनिकांचे विधवा यांच्या स्वतःच्या नावावर असलेल्या मालमत्तेच्या मालमत्ता करातून कर माफीस पात्र ठरणा-या व्यक्तीने जिल्हा सैनिक कल्याण अधिका-याचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर मा. शासन निर्णयाच्या तारखेपासून म्हणजेच सन २०१६-१७ या आर्थिक वर्षापासून सूट देणेस व अशा मिळकतीकडून फक्त पाणीपट्टी वसुली करणे योग्य राहील तरी उपरोक्त प्रमाणे कार्यवाही ठेवणे व सदरची बाब माहितीस्तव मा. महानगरपालिकेकडे पाठविणेकामी कर आकारणी व कर संकलन प्रमुख तथा विशेष कार्यकारी अधिकारी (शहर हद्दवाढ) यांनी मानिनियांकडे निवेदन सादर केले असता माननियांनी **शासनाचे G R प्रमाणे प्रस्ताव मा.स.सा.कडे सादर करावा. मात्र सदर सवलत केवळ रहिवाशी कारणांसाठी लागू राहील. शिक्षण कर, पाणीपट्टी इ. वसूल करणे आवश्यक आहे.** असा शेरा नोंदविलेला असून, मा. आयुक्त यांचे दिनांक २९-१०-१७ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे. तसेच मा. शासन आदेशाप्रमाणे बीएसएफ जवान यांना देखील सवलत देणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. १३८ ठ. क्र. १०२ दि. १४/३/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिकेचे क्रीडा विभागाकडील पार्क मैदान येथील जिमखाना नुतनीकरणबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयांकित कामाचे सविस्तर पूर्वगणनपत्रक क्र. ११ र.रुपये १,८०,६५,४००/- इतकेचे तयार केले असून सदर कामासाठी मा. शासनाकडे अनुदान मागणी करणेचे असलेने प्रकरणी मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक २०-११-१७ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ ९३६ ठ. क्र. ......१०३
दि. २९/१/२०१८ ....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१३१

डॉ.बी.टी.दूधभाते, अतिरिक्त जिल्हा आरोग्याधिकारी, जि.प.सोलापूर यांचे कडे आरोग्याधिकारी, मनपा सोलापूर या पदाचा अतिरिक्त कारभार सोपविलेबाबत प्रकरणी डॉ.बी.टी.दूधभाते, अतिरिक्त जिल्हा आरोग्याधिकारी, जि.प.सोलापूर यांचे कडे आरोग्याधिकारी, मनपा सोलापूर या पदाचा अतिरिक्त कारभार सोपविणेबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.अति.जिल्हा आरोग्याधिकारी, जि.प.सोलापूर यांच्याकडे पुढील आदेश होईतोपर्यंत महानगरपालिकेतील आरोग्याधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार दि.०५/१२/२०१७ पासून सोपविण्यात येत असलेचे कार्यालयीन आदेश मा.आयुक्त यांचे दि.०५/१२/२०१७ माहितीस्तव आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. अ. 180 ठ. क्र. 908
दि. 5/3/98 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूरचे रहिवासी स्व. हरिदास जनार्दन गायकवाड, हे पोलीस या पदावर कार्यरत असतांना त्यांचे निधन झाले असून, ते एकता नगर पोलीस सोसायटीचे माजी चेअरमन होते. ते एक सामाजिक कार्यकर्ते होते, त्यांनी केलेल्या कार्याचे स्मरण रहावे यादृष्टीने एकता नगर जवळ एम.आय.डी.सी. रोड, राघवेंद्र अपार्टमेंट समोरील तयार होणा-या चौकास **स्व. हरिदास जनार्दन गायकवाड चौक** असे नामकरण करणेस, नामफलक लावणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.जा. ७८९ ठ. क्र. ९०५ दि. १५/३/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



पारसमणी कै. लक्ष्मणराव माधवराव इनामदार (वकीलसाहेब) यांचे सहकारला संस्कार झाले पाहिजेत असे ठाम मत होते. मूल्य, आदर्श, संस्कार हा मूलमंत्र देणारे स्वर्गीय लक्ष्मणराव इनामदार हे मा.पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचे गुरु होते. याचा उल्लेख मा.पंतप्रधानानी आपल्या **"ज्योतीपुंज"** या पुस्तकात केला आहे. भारतीय अर्थनितीचा आधार हा सहकारातून व्हावा, सहकार स्वायत्त होऊन स्वावलंबी भारत घडावा, मुक्त अर्थ व्यवस्थेला सहकार पर्याय व्हावा, सशक्त भारत बनण्यासाठी सहकाराची समृध्दी व्हावी आणि सहकारातून उध्दार व्हायचा असेल तर सहकार हा संस्कारीत व्हावा असा त्यांचा नारा होता. संपूर्ण आयूष्य त्यांनी सहकारासाठी वाहून घेतले होते आणि आज आपण पाहतो आहोत की, संपूर्ण महाराष्ट्रातच नव्हेतर संपूर्ण देशातील सर्व राज्यांमध्ये सहकारी बँका, कारखाने, दूध डेअ-यांच्या माध्यमातून भारत समृध्द होत आहे. याच सहकारातून अनेक लोकनेते तयार झाले ज्यांनी या देशाच्या अनेक उच्चतम पदांपर्यंत झेप घेतली आहे. सहकारावर संस्कार घडले पाहीजेत यासाठी संपूर्ण आयुष्य वेचणा-या कै.लक्ष्मणराव माधवराव इनामदार यांना पारसमणी म्हणूनही संबोधले जात होते आणि अशा आदर्शवत व्यक्तींचे स्मरण निरंतर नवीन पिढीला रहावे म्हणून डफरीन हॉस्पिटलच्या समोरील चौकाला **"पारसमणी कै.लक्ष्मणराव माधवराव इनामदार चौक"** असे नाव देण्यास व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मा~~सिक~~/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१४२ ठ. क्र. ......९०४
दि. १४।३।९८.... रोजी ठेवला झालेला प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



सौ. निर्मला मल्लीकार्जून नरोने वय वर्ष ३५ राहणार, पश्चिम मंगळवार पेठ, बुधले गल्ली, सोलापूर यांना कॅन्सर हा आजार झाला असून त्यांच्यावर बार्शी येथील कॅन्सर हॉस्पीटल येथे उपचार चालू असून दरमहा रु. ५०,०००/- इतका खर्च येत आहे. सदर आजारावर उपचार करणेकरिता कर्ज काढून उपचार करण्यात आलेले आहे. सौ. निर्मला मल्लीकार्जून नरोने यांची घरचीं आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीची व हालाखीची असल्यामुळे सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने जास्तीत जास्त वैद्यकीय आर्थिक मदत मिळणेस मान्यता देणेस्तव आलेला प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ९८३ ठ. क्र. २०८
दि. १५/३/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१४३

अक्कलकोट रोड एमआयडीसी येथील पोस्ट ऑफिस ते चेतन हॉटेलपर्यंतचे मार्गास पद्मशाली समाजाचे आद्य वस्त्रनिर्माते **भगवान श्री भावनाऋषी मार्ग** असे नामकरण करणेस, सदर दोन्ही रस्त्याचे ठिकाणी नामफलक लावणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. १४४ ठ. क्र. ९०८ दि. २५/३/९८ रोजी ठेवला खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



श्री. सुहास सतीश चंव्हाण वय वर्षे २५ रा. १०३३/३४ जुनी पोलीस लाईन मुरारजी पेठ सोलापूर यांना घशाचा कॅन्सर झालेला असून त्यांच्यावर दिनानाथ मंगेशकर रुग्णालय, पुणे येथे ऑपरेशन, औषधोपचार केलेला आहे. सदर औषधोपचार व ऑपरेशनसाठी त्यांना ३ लाख रु. खर्च आला आहे. श्री. सुहास सतीश चव्हाण हे सुशिक्षीत बेरोजगार असून त्यांची घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याने त्यांना महानगरपालिकेतर्फे जास्तीत जास्त आर्थिक वैद्यकीय मदत देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव.
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१८५ ठ. क्र.......१०९ दि. १५/३/१८....रोजी ठेवता आलेला प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सन १९५२ मध्ये पार्क मैदानावर श्री.मोतीसा बिद्री, श्री. विरभद्र रेगळ व श्री. गंगाधर शेटे यांनी मिळून सोलापूर व्हॉलीबॉल क्लब नावाची संस्था स्थापन केलेली आहे. सदरची संस्था पार्क मैदानावर आजतगायत कार्यरत आहे. कै.मोतीसा विद्री राष्ट्रीय व्हॉलीबॉल खेळाडू होते. त्यांनी १९६५ साली पतियाळा येथे झालेल्या राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेत महाराष्ट्र व्हॉलीबॉल संघाचे कर्णधार पद भुषविलेले होते. सदरची संस्था ही ६५ वर्ष कार्यरत असणारी महाराष्ट्रातील एकमेव संस्था असून कै. मोतीसा बिद्री सन १९८२ ते १९८५ मध्ये महाराष्ट्र राज्य व्हॉलीबॉल संघटनेचे रेफ्री बोर्ड अध्यक्ष होते. आणि १९८६ ते १९८९ पर्यंत खजिनदार पदी कार्यरत होते. कै. मोतीसा बिद्री यांनी स्वत: पुढाकार घेऊन सोलापूर शहर व जिल्हयातील सर्व क्रीडा संघटनेचे प्रतिनिधी एकत्र करुन सोलापूर शहर व जिल्हा क्रिडा फेडरेशनची स्थापना करण्याची संकल्पना त्यांनी माडली. त्या फेडरेशनचे स्थापनेपासून निधनापर्यंत त्यांनी अध्यक्ष पद भुषविले.

तेंव्हा एक दिग्गज खेळाडू व संघटक व्यक्तीमत्व असलेले **कै. मोतीसा बिद्री** यांचे नाव पार्क मैदान येथील पुर्वेकडील व्हॉलीबॉल क्रिडांगणास देण्यास आणि सदर ठिकाणी त्यांच्या नावाचा नामफलक लावणेस मान्यतेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.जा.९८६ ठ. क्र. ....९९०
दि. १५/३/१८ रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र.१, गूमटे वस्ती जुना तुळजापूर रोड मारवाडी स्मशानभुमी लगत असलेल्या रुपाभवानी मंदीर गुमटे वस्ती बायपास बोगदा (ब्रीज) यास थोर समाजसेवक **कै.मल्लिनाथ गुरुपादप्पा गुमटे** असे नामकरण करणेस, याप्रमाणे नामफलक लावणेस मान्यतेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ.१४८ ठ. क्र....१११ दि.१५/३/१८...रोजी ठेवला आलेला प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता विविध योजने अंतर्गत विकास कामासाठी निधी उपलब्धतेबाबत प्रस्तावात नमुद अ.क्र.१ ते ६ योजने अंतर्गत विविधी विकास कामासाठी अनुदान उपलब्ध होणेकामी सान २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता जिल्हा वार्षिक योजना माध्यमातून उक्त योजनांमधील कामांचे यादीस (सोबत जोडल्याप्रमाणे) व अ.क्र.१ नगरोत्थान अभियान (जिल्हास्तर) अंतर्गत र.रु.९६.२० कोटी रक्कमेच्या म.न.पा.हिश्याची ३०% र.रु.२८.८६ कोटी इतकी रक्कम तरतूद होऊन मिळणेकामी मा.आयुक्त यांचे दि.३०/११/२०१७ टिपणीप्रमाणे आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

जिल्हा वार्षिक योजना सन २०१८-१९ अंतर्गत नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) माध्यमातुन उपलब्ध होणारे अनुदानानुसार शहर व हद्दवाढ भागात अत्यावश्यक असणाऱ्या विकासाची कामे मा.आयुक्त यांनी प्राधान्याने हाती घेणेस मान्यता देणेत येत आहे.

प्राधान्याने घेणेत आलेली कामे व त्यांचे पुर्वगणनपत्रकास मान्यता देण्यात येत आहे.

प्राधान्याने घेण्यात येणाऱ्या कामाच्या खर्चापोटी म.न.पा.हिस्स्याची रक्कम (३०%) तरतुदी बाबत मा.आयुक्तांना अधिकार देणेत येत आहे.

(सही)

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/खास

सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.जा.९८...ठ. क्र.....११२

दि..१५।३।१८.. रोजी ठेवला असता प्रो. ठराव

बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरातील अनाधिकृत नळ कनेक्शन शोधून ती अधिकृत करणे फोजदारी दाखल केलेल्या मिळकतदारावर करावयाचे कार्यवाही बाबत मा.अपर्णा गिते, पोलिस उपायुक्त (परिमंडळ) सोलापूर शहर यांचे प्रस्तावात नमुद प्रमाणे मत पाहता प्रस्तावात नमुद प्रमाणे अनाधिकृत नळ कनेक्शन निदर्शनास येईल त्या वर्षापासून त्यांचे मिळकतीमध्ये नळ कनेक्शन बाबतची योग्य ती नोंद कर आकारणी विभागाकडून योग्य त्या रजिस्टरला नोद घेणेत येऊन त्या मिळकत धारकाकडून नाममात्र दंड, कोटेशन, मिटर आकारणी, नळ कनेक्शन डिपॉजिट इत्यादी पोटी रु.१०,०००/- इतकी दंड भरुन घेऊन त्या वर्षा पासून नळ आकारणी चालू करणे. मिळकतधारकावर नाममात्र दंड आकारण्यात येत असल्यामुळे, फौजदारी गुन्हा दाखल करणेत येणार नसलयामळे नागरिकांकडून शोध मोहिमेस योग्य तो प्रतिसाद मिळण्याची शक्यता असलेने प्रस्तावात नमुद प्रमाणे मा.सर्वसाधारण सभेची धोरणात्मक निर्णय होऊन मिळणेस्तव मा.आयुक्त यांचे दि.२६/११/२०१७ टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

र.रुपये १०,०००/- प्रमाणे दंडाची आकारणी करण्यात यावी. नळ कनेक्शन घेतल्याची चौकशी करण्यात यावी व ज्यावेळेस त्यांनी नळ कनेक्शन घेतल्याची खात्री करुन त्याप्रमाणे आकारणी करणेत यावी यांस मान्यता देणेत येत आहे.

तसेच नळ शोध मोहिम ही सातत्याने सुरु ठेवणेत यावी ठराविक कालावधी पुरती मर्यादित ठेवु नये यास ही सभा मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. १४६ ठ. क्र. ११३
दि. १५/३/१८ रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१४९

सोलापूर महानगरपालिका व सोलापूर सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्यात सामंजस्य करार करुन मनपा समवेत करणेत येणारा सांमजस्य करार प्रस्तावात नमुद प्रमाणे महानगरपालिकेच्या मालमत्तेचा कुठेही दुरुपयोग न होता मनपाच्या मालकीच्या जागेचे सुनियोजन होणे गरजेचे असल्याने स्मार्ट सिटीच्या केंद्र /राज्य शासनाच्या निधीतून विविध विकास काम होऊन मनपाच्या मालमत्तेची जपणुक होणे आवश्यक आहे. व ती महानगरपालिकेच्या हिताच्या दृष्टीकोनातून प्रस्तावात नमुद प्रमाणे सोलापूर सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमिटेड यांच्या समवेत सामंजस्य करार करणेस मा.सर्वसाधारण सभेची धोरणात्मक मान्यता मिळणेकामी मा.आयुक्त यांचे दि.१५/१२/२०१७ टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

तसेच प्रत्येक काम हाती घेणेपुर्वी त्याची माहिती मा.म.न.पा.सर्वसाधारण सभेस देणेत यावी.

(signature)
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

**सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष**
**सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज ९५० ठ. क्र. ......९९४**
**दि. २५/३/९८ ...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव**
**बहुमताने/सर्वानुमते पास झाला.**



श्री शहाजी ज्ञानेश्वर जाधव, राहणार- अक्कलकोट रोड, संगमेश्वर नगर, सुतमिल समोर प्लॉट नं.११५, सोलापूर. हे कारखान्यात काम करणारे मजूर आहेत. यांची आर्थिक परिस्थिती खूपच नाजूक आहे. यांचा मुलगा चि.विजय शहाजी जाधव हा स्वामी विवेकानंद पॉलीटेक्नीक, सोलापूर येथे शिक्षण घेत आहे. तो.Head injury with Rt femure fracture and frontotempoperital decompression crainiotomy and dureplatting या आजाराने त्रस्त आहे. सध्या श्लोक हॉस्पिटल, हवेली, पुणे येथे त्याच्यावर उपचार चालू आहे. त्यांच्या उपचाराचा एकूण खर्च र.रु.८,००,०००/- अपेक्षीत आहे.

तरी त्यांच्या मुलाच्या उपचारासाठी र.रु.५०,०००/- चे आर्थिक सहाय्य करणेस मान्यतेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. अ १५७ ठ. क्र. ११५
दि. १५/३/९८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१५१

श्रीमती सलीमा इब्राहिम जहागिरदार वय वर्ष ४० राहणार- भगवान नगर झोपडपट्टी सोलापूर यांना कॅन्सर हा आजार झाला असून त्यांच्यावर केळकर नर्सिंग होम सोलापूर येथे उपचार चालू आहेत. सदर आजारावर उपचार करणेकरीता कर्ज काढून उपचार करण्यात आलेले आहे. श्रीमती सलीमा इब्राहिम जहागिरदार यांची घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीची व हालाकीची असल्यामुळे सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने जास्तीत जास्त वैद्यकीय आर्थिक मदत मिळेणस मान्यतेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ... अपूर्ण ठ. क्र. ...१९६
दि. १५/३/१८.... रोजी ठेवला असता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

लाल-२/५५-५

महानगरपालिका क्षेत्रात मूलभूत सोयी सुविधांचा विकास सन २०१६-१७ या योजनेअंतर्गत विविध विकास कामे करणेकरिता र.रु. २५.०० कोटी निधी मंजूर करणेत आलेले असलेबाबत मा. अवरसचिव महाराष्ट्र शासन क्र. पुरक - २०१६ प्र.क्र. २७५ (४) नवि-१६ नगर विकास विभाग दिनांक १५ नोव्हेंबर, २०१६ अन्वये प्राप्त झालेला आहे.

प्रस्तावात नमूद योजनेअंतर्गत मा. शासनाच्या निर्णयानुसार खालील नमूद कामे मा. पालकमंत्री, सोलापूर जिल्हा, मा. जिल्हाधिकारी, सोलापूर, मा. आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांच्या त्रिसदस्यीय समितीने दिनांक १७-१०-२०१७ रोजी मा. जिल्हाधिकारी कार्यालय येथे झालेल्या बैठकीमध्ये मनपाकडून सादर करणेत आलेल्या ३०८ कामाच्या यादीपैकी एकूण १०७ कामाचे र.रु. २४.७६ कोटीची मंजूर तरतूदी इतक्या रकमेची कामे निश्चित करण्यात आलेली असून, प्रस्तावात नमूद १०७ पैकी १ ते ३ बाबीमध्ये नमूदनुसार एकूण सात कामे (सात कामापैकी चार कामे अन्य निधीतून पूर्ण झालेले असून, एक काम नगरोत्थान योजना (जिल्हास्तर) मधून प्रस्तावित आहे, तर दोन कामे तांत्रिक कारणास्तव काम हाती घेता येणार नाही.) रद्द करून, उर्वरित प्रस्तावात नमूद १०० कामांचे पूर्वगणनपत्रक प्रकरणासोबत जोडलेले असून, त्याची र.रु. २३.८४ कोटी इतक्या रकमेच्या पूर्वगणनपत्रकास मा. महानगरपालिकेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक ११-१२-२०१७ चे टिपणीप्रमाणे मा.स्थापत्य समिती ठराव क्रमांक १४० दि.१२/१२/२०१७ शिफारशीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | पुर्वगणनपत्रक रक्कम | नगर अभियंता/ सार्व. आरोग्य अभियंता,सो.म. पा. यांची तांत्रिक मायता क्र. व दिनांक |
|---|---|---|---|
| १ | प्र.क्रं.२ रविवार पेठ, जोशी गल्ली येथील उध्दव महाराज सरवदे घर ते नागनाथ शिंदे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ०.०० | |
| २ | प्र.क्रं. १ येथील स्टेट बँक कॉलनी, चडचणकर घर ते तोगी घरापर्यंत सिमेंट क्रॉक्रीट रस्ता करणे | ०.०० | |
| ३ | प्र.क्रं. १ श्रीशैल नगर, अगरवाल घर ते दुलंगे घर पर्यंत सिमेंट क्रॉक्रीट रस्ता करणे | ७८०३१४.०० | ३ ०७/१२/२०१७ |
| ४ | प्र.क्रं.१ मधील धोत्रीकर वस्ती येथील अनिफ शेख घर ते संगु दंगनाळ घरापर्यंत सिमेंट क्रॉक्रीट रस्ता करणे | ५३९९३७.०० | ४ ०७/१२/२०१७ |
| ५ | प्र.क्रं. १ तांबे बोळ मड्डीवस्ती येथील स्वामी घर ते गवळी घरापर्यंत सिमेंट क्रॉक्रीट रस्ता करणे | ४७४३८२.०० | ५ ०७/१२/२०१७ |
| ६ | प्र.क्रं. ६ होमकर नगर येथे अंतर्गत ६ इंची ड्रेनेज लाईन घालणे | २५००२१०.०० | ४० ०५/१२/२०१७ |
| ७ | प्र.क्रं. ३ इपलपल्ली किरणा ते ज्योतीबा आवताडे घरापर्यंत (उदगिरी बोळ ) रस्ता डांबरीकरण करणे | ५८७९३५.०० | ७ ०७/१२/२०१७ |
| ८ | प्र.क्रं. ३ येमुल घर ते निंबर्गीकर घर पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे . | ९७२७०७.०० | ८ ०७/१२/२०१७ |
| ९ | प्र.क्रं. ३ घोंगडे वस्ती बत्तुल वाडा ते सिंगराल घरा पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ७१०३२१.०० | ९ ०७/१२/२०१७ |
| १० | प्र.क्रं. ३ गणपत कुरापाटी बोळ व आडम गव्वल घरापर्यंत रस्ता क्रॉक्रीट करणे | २५९०६७.०० | १० ०७/१२/२०१७ |
| ११ | प्र.क्रं. ३ डॉ. कारमपुरी घर ते कोंडी घर ते सुधीर जनरल स्ट्रोअर पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ६७३२७०.०० | ११ ०७/१२/२०१७ |

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज तात-२/१५३ ठ. क्र. ११७
दि. १५/३/१८ रोजी ठेवता झालेले प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

तात-२/१५३

हाय लेव्हल झोन पंप हाऊस व साधु वासवानी बागेतील मेडिकल पंप हाऊस येथील पंपींग मशिनरी सुमारे ३५ वर्षे जुने झाल्याने,नविन पंपसेट बसविणे कामाचे प्रस्तावात नमुद कारणास्तव पूर्वगणनपत्रक क्र.--/ सन २०१४-१५ र.रुपये ८१,५६,६१३/- यांस मा.स्थापत्य समितीची मान्यता मिळून, मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा.आयुक्त दिनांक २५/१०/२०१७ चे टिपणीप्रमाणे मा.सर्वसाधारण सभेकडे मा.स्थापत्य समिती ठराव क्रमांक ११८ दि.१२/१२/२०१७ शिफारसीने आलेल्या पुर्वगणकपत्रकास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. तात-३/१५४ ठ. क्र. ११८
दि. १५/३/१८ रोजी ठेवला असलेला प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

तात-३/१५४

श्री. म. रफिक बाबूमियाँ हत्तूरे, सदस्य, सोलापूर महानगरपालिका यांनी दिनांक १४-११-२०१७ रोजी पत्र देऊन दि. ६-११-२०१७ रोजी पासून हदयाचा त्रास होत असल्याने महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेस तीन महिने उपस्थित राहून शकणार नाही असे पत्र दिले होते. तथापि नगरसेवक श्री. म. रफिक बाबुमियाँ हत्तूरे यांचे दिनांक २१-११-२०१७ रोजी दुःखद निधन झाले असल्याने सदरचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव ठेवणे उचित होणार नाही. परंतू त्यांचे पत्रामध्ये उल्लेख केलेल्या दिनांक ६-११-२०१७ ते दिनांक २०-११-२०१७ अखेर मा. सर्वसाधारण सभेस अनुपस्थित राहणेबाबत मा. सर्वसाधारण सभेची मान्यता घेणेकामी सदरचा प्रस्ताव माहे डिसेंबर २०१७ रोजीच्या मा. सर्वसाधारण सभेसमोर ठेवणेस्तव मा. आयुक्त यांचे दिनांक १८-१२-२०१७ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका